डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# श्रीकृष्ण महाविद्यालय, गुंजोटी

ता. उमरगा जि. उस्मानाबाद

प्रकल्प लेखन अहवाल

वर्ष : २०२१-२२

प्रकल्प लेखनाचा विषय

## *सिंधुताई सपकाळ व्यक्ती आणि वाङ्मय*

विद्यार्थ्यांचे नाव

*विद्या सुनिल सुर्यवंशी*

मार्गदर्शक प्राध्यापकाचे नाव

प्रा. *पी.जी. चौधरी सर*

मराठी विभाग प्रमुख

75/100

अंतर्गत परीक्षक बहिस्थ परीक्षक विभाग प्रमुख



1

# सिंधुताई सपकाळ 1948-

अनाथांची सेवा करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या, 'ममता बालसदन' या संस्थेची स्थापना करून अनाथ मुलांचे सांभाळ करण्याचे समाज कार्य त्या करत आहेत. त्यांनी अनेक अनाथ मुलांना शिक्षण दिले जगण्याची प्रेरणा दिली आणि सर्वात महत्वाचे म्हणजे समाजात मानाचे स्थान मिळवून दिले.

'मी वनवासी' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांना 'अहिल्याबाई होळकर 'सावित्रीबाई फुले' या पुरस्काराने सन्मानित केले गेले. तसेच 'सत्पाल मित्तल नॅशनल अॅवॉर्ड व फाय फाउंडेशन' यांचेही त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या जीवनावर आधारित 'मी सिंधुताई सपकाळ' हा चित्रपट प्रकाशित झाला आहे. सिंधुताई या लयबद्ध वक्तृत्वासाठी प्रसिद्ध आहेत

सिंधुताई, सपकाळ यांना प्रतिकूल परिस्थिती तरी शिकण्याची प्रचंड जिद्द दिसून येते.

Page No. : 
Date : / /

त्यांना लहानपणी सगळेजण 'चिंधी' म्हणत. चिंधी अभिमान साठे. ~~माझा~~ यांचा जन्म 14 नोव्हेंबर 1948 रोजी नवरगाव फॉरेस्ट येथे झाला. त्या त्यांच्या वडिलांना 'अभ्याजी' म्हणायच्या त्यांचे घर छोटेसे होते.; पण छान होते. अंगणात गुरं, गाई-म्हशी होत्या.

त्या रोज म्हशी घेऊन शाळेसमोरून जात त्या शाळेचं नाव होतं, 'बुनियादी ग्रामशाळा पिंपरी (मेघे), आर्वी रोड, जि. वर्धा.' शाळा म्हणजे एक भला मोठा हॉल होता. धान्य ठेवायला गोडाऊन बांधतात तसा, वर कौलं असलेला. समोर एक छान भलंमोठं चाफ्याचं झाड होतं त्याची टपोरी पांढरी शुभ्र फुलं शाळेच्या अंगणात पडलेली असायची म्हशी घेऊन जाताना शाळेपाशी आल्या कि त्या शाळेपाशी / शाळेपुढे थांबत असायच्या शाळेत जाणाऱ्या मुली चांगले कपडे घालून, वेणी-फणी करून शाळेसमोर खेळत असायच्या. काहीजणी झाडाखाली बसून अभ्यास करत असायच्या. तेव्हा त्यांना पण वाटायचं..... 'आपण पण शाळेत जावं.' त्या एकदा अभ्याजींना म्हणाल्या म्हणजे त्यांच्या वडिलांना म्हणाल्या, "अभ्याजी, मला शाळेत जाऊन शाळा शिकायचीय." चुलीपुढे बसून भाकरी करणाऱ्या आईने हे ऐकलं अन ती तरातरा बाहेर आली. आणि म्हणाली, "चिंधे, काय म्हणालीस? .... शाळेत जायचं... अन् रोज म्हशी कोण सांभाळील? आपल्या सोळाच्या घराण्यात अजून कुणी शाळेची पायरीसुद्धा चढलं नाही... अन शाळेत जायचं म्हणते शहाणी अभ्याजी आईचं ऐकत होते: पण काहीच बोलत नव्हते. त्या रडायला लागल्या; पण त्यांचं

कोणीचढ ऐकत नव्हतं. त्यांचे वडील म्हणाले. "गप्प बस." त्यांना कुणी रडलेलं आवडत नसे. त्यांचे वडील अभिमान साठे. नावाप्रमाणे अभिमान वाटावा असे ते होते. दुसऱ्या दिवशी ते माईला घेऊन शाळेत गेले. त्यांनी त्यांचे नाव शाळेत घातले.

वयाच्या नवव्या वर्षी त्यांना शाळेत घातले गेले. गावातलेच वैदिले गुरुजी मुख्याध्यापक होते. पांढरेशुभ्र धोतर, त्यावर नेहरू शर्ट व डोक्यावर पांढरी टोपी असा त्यांचा पोशाख होता. वडिलांनी माहिती सांगितली. आणि वैदिले गुरुजींनी माहिती लिहिली अण्णांचा त्यावर अंगठा घेतला आणि त्यांची /माईची शाळा सुरू झाली. शाळेत नाव घातलं, तरी म्हशी सांभाळायला जावंच लागायचं. सकाळी शाळा भरायच्या वेळी घंटा ऐकू येत असे. माईना शाळेत जावंसं वाटायचं; पण जाता येत नसे. सकाळी 7 ते 1 वाजेपर्यंत व नंतर 3 ते 5:30 पर्यंत अशी दोन वेळा शाळा भरायची. सकाळची शाळा माईना सापडत नसे. म्हशी चारायला गेलं, की शाळेजवळ खालच्या बाजूला जो छोटा डोह होता, त्यात म्हशी डुंबत बसत. मग त्या तास दोन तास निवांत होत असे, तेव्हा शाळेचा राहिलेला अर्धा वेळ माई पाटीचा फुटका तुकडा आणि फाटकं पुस्तक घेऊन शाळेत जात असत. शाळा भरलेलीच असत. काही मुलं मोठमोठ्याने एक - दोन असे पाठ सुरात म्हणत असायची. तिसरी आणि चौथीला वैदिले गुरुजी शिकव तर पहिली- दुसरीला कांबळे गुरुजी शिकवत. चार कोपऱ्यांत चार वर्ग अशी रचना असे. हो माई वर्गात गेल्या, की मुलं - मुली म्हणतं, "

"गुरुजी, चिंधी आत्ता शाळेत आली बघा.
वेंदिले गुरुजी माझ्याकडे रागाने बघत; पण कोवळे गुरुजींचे आश्वासक डोळे मला न बोलता सांगत, "ये, बस वर्गात."

माझ्यावर त्यांनी खूप माया केली. माई शाळेत उशिरा गेले तरी ते रागावत नसत. त्यांची उबदार माया नसती, तर ~~मी~~ माई थोडीफार शिकले तेवढेही शाळा शिकू शकले नसते. आयुष्याच्या वैराण वाळवंटात जशी सावली असावी तशी माईना गुरुजींची माया वाटायची. गुरुजी पाटीवर 'ग' 'म' असं लिहून देत. परत परत लिहाय ला सांगत. ते विचारत "तू जेवलीस का? ~~मला~~ माई ला काय बोलाव ते कळत नसे शाळेची घंटा झाली, की सर्व मुले - मुली जेवायचे ला बसत. माई त्यांच्या तोंडाकडे बघत बसे. पोटात भूक लागलेली असे. मुले - मुली जेवन करुन खेळायला गेल्या की माई लाडूचा तुकडा, भुरका, गुळाचा खडा, जिलेबीचा तुकडा मातीतून फुलात उचलून ठेवत असे. सर्वांना वाटायचं, त्या चाफ्याची फुलंच गोळा करतात. पण त्या फुलातला माती लागलेला तो अन्नाचा कण चाफ्याच्या सुगंधाने चवदार व गोड लागायचा. त्यावर घोटभर पाणी पिऊन माई वर्गात बसायची.

कधी कधी म्हशींमुळे दिवस दिवस शाळेत जाता येत नसे. आमच्या / तिथे ~~चि~~ चिखलदऱ्यात भराडी नावाची एक वनस्पती येते.
चांगलं तळहाताएवढं मोठं पान असतं. त्याला खाली एक काटा असतो. त्या भराडीचा काटा हे त्यांचं पेन व भराडीचं पान हा त्याचा कागद असे.
म्हशीमागे जात जाते अ, आ, इ, ई, उ, ऊ अशी

अक्षर लिहिणं माई शिकू लागल्या. असं निसर्गाच्या सोबतीनं लिहिलेलं म्हणून शिकलेलं कधी विसता आलं नाही.

ही अशी 'हाफ टाईम' शाळा करीत करीत माई चौथीपर्यंत आल्या. गोपुरीला केंद्रशाळा होती चौथीची परीक्षा होती. माई पास झाल्या आणि चौथीचा रिझल्ट आणायला माई शाळेत गेल्या तर वंदिले गुरुजी म्हणाले, "चिंधे तू पास झालीस. आता चिंधी नावाची चिमणी उडून जाण

माई तो कागद घेऊन बाहेर पडल्या; पण वळून वळून शाळेकडे पाहत होत्या. त्या भिंतीव चुन्यानं लिहिलेली 'बुनियादी प्राथमशाळा पिंपरी (मेघे ही अक्षर पुसट पुसट होत होती.
त्यावरची शाई आसवांच्या त्या पाण्यात कागदभर पसरत पसरत होती.

माईचं लग्न त्यांच्या वयाच्या १२ व्या वर्षी श्रीहरी सपकाळ यांच्याशी झालं. ते माईपेक्षा २० ते २६ वर्षानं मोठे होते. लग्नानंतर त्या वर्धातील सेलू येथील नवरगाव गावात गेल्या माईना सासरी प्रचंड सासरवास होता. त्यांचा सास छळ होण्याची जी कारणं आहेत त्यापैकी एक कारण म्हणजे माईची शुद्ध भाषा! दुसरं कारण म्हणजे त्यांचं वाचन! माईच्या सासरी शिक्षणाचा गंधही नव्हता सासरचे लोक अशिक्षि अक्षरशत्रूच. त्यांना काहीही वाचता येत नसल्यामुळे त्यांच्यासमोर वाचायला कागद हातात घेतला, की त्यांच्या कपाळाला आठ्या पडायच्या पुढे पुढे माई चोरून वाचायला लागल्या.
जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेला कागदाचे तुकडे माई घरी आणायच्या आणि

VEDHA
Page No. :
Date : / /

6

उंदराच्या बिळांत लपवून ठेवायच्या. क्वचित घरी एकट्या असल्या तर त्या अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत. एकदा गदिमांची एक कविता छापलेली एक कागदाचा कागदाचा तुकडा सापडला.

माऊलीच्या दुग्धापरी आले मृगाचे तुषार।
भुकेजल्या तान्ह्यासम तोंड पसरी शिवार।।

माई वाचनाची भुकेली होतीच. गदिमांच्या या ओळी त्यांना आणखी भुरळ घालत होत्या. त्या दिवशी घरात बरीच गर्दी होती. त्यामुळे तो कागद घरापासुन दूर जाऊन एका मोठ्या (बिळ तो कागद ठेवला तो कागद बिळात ठेवताना त्यांना मुंगुस चावला.

कवितेतील मृगाच्या तुषारांवर ~~माझ्या~~ रक्ता धार सुरु झाली. जणू त्यांच्या अडचणींवर ज्ञानतृ षेचा अभिषेक झाला. त्यांना वाचनाची इतकी ओढ होती. माई म्हणाल्या, मी प्रवाहाच्या उलट वाहत असल्यामुळे मला हा त्रास होत होता. मी प्रवाहात झोकुन दिलं नाही. स्वतः ला. मला सापडलेली शिक्षणाची अनोखी पाऊलवाट ठेचकाळ रक्तबंबाळ होत मी चालत राहिले.

माई अठराव्या वर्षापर्यंत माईची तीन बाळंतपणे झाली. त्या चौथ्या वेळी गर्भवती असताना त्यांना त्यांच्या आयुष्यातला पहिला संघर्ष केला.

तेव्हा गुरे वळणे हाच व्यवसाय असायचा. गुरेहीं गुरेही शेकड्यानी असायची. त्यांचे शेण काढत काढता बायकांचे कंबरडे मोडायचे. शेण काढून. बाया अर्धमेल्या व्हायच्या. पण त्याबद्दल कोणतीही मजुरी मिळायची नाही.

रस्त्यावर मुरुम फोडणाऱ्यांना मजुरी पण शेण काढणाऱ्यांना नाही. या शेणाचा लिलाव फॉरेस्ट

करायचे. इथे सिंधुताईनी बंड पुकारले.
आणि लढा सुरु केला. त्यामुळे या लिलावात
त्यांना हप्ता मिळायचा त्यांच्या हप्त्यावर गद
आली. हा लढा जिंकल्या पण त्यांना या
लढ्याची जबर किंमत चुकवावी लागली. बाईच्या
या धैर्याने गावातील जमीनदार, दमडाजी
असतकर दुखावला गेला होता. त्याची जंगल-
खात्याकडून येणारी मिळकत बंद झाली.
दमडाजीने सिंधुताईच्या पोटातील मूल आपले
असल्याचा प्रसार सुरु केला. माईच्या नवऱ्याच
मनात माईच्या चारित्र्याबद्दल संशय निर्माण
झाला. आणि पूर्ण दिवस भरलेल्या माईना
त्याने बेदम मारुन घराबाहेर काढले. गुरांच्या
लाथा बसून मरतील म्हणून त्याना त्या
अर्धमेल्या अवस्थेत गोठ्यात आणून टाकले. पण
एक गाय माईच्या अंगावर उभी होती पण ती
माईच्या अंगावर पाय दिला नाही. ती गाय त्यांचं
रक्षण करत होती. त्यावेळी त्यांना त्या गोठ्यात
एका मुलीला जन्म दिला आणि त्यांनी आप
नाळ दगडाने तोडली आणि त्या गाईना
वचन दिले, ~~त्यांनी गोरक्षक केंद्र मग स्थापन
केली.~~ मग माई तिथून निघाल्या 10 दिवसाचे
बाळ घेऊन, त्या भटकट होत्या. मग त्या एका
माहदेवाच्या मंदिरात थांबल्या व तिथुन त्या एका
ट्रक मध्ये चढल्या आणि वर्धा ला निघाल्या
आणि आरवी नाक्या जवळ उतरल्या त्या आरवी
रोड .वर एका झाडाखाली बसल्या होत्या
~~संध्या~~ संध्याकाळी एक रिक्षा वाला बाबा
माईला म्हणाला बेटी आप सुबह से यहाँ बैठे
हो आपको कही जाना है क्या!

माई पटकन म्हणाल्या हा बाबा मला भाट्याच्या दुकानात जायचं आहे. बाबा म्हणाला, तो रिक्षा में बैठो माई म्हणाल्या कि माझ्याजवळ पैसे नाहीत. रिक्षावाला म्हणाला, कोई बात नहीं हमें पैसे नही चाहिये मग माई रिक्क्षात बसल्या मग माई भाट्याच्या दुकानात उतरल्या त्यांना त्याची आई समोर दिसली. आणी माईच्या हातापायात बळ आल माईला आईला भेटण्याची घाई झाली होती.

माई ची आई रडायला लागली ती रडत होती कारण माई त्याच्याकडे येऊ नये म्हणून आणी त्या माईवर ओरडल्या बाई गं तू कुठे ही जा वाटल्यास रेल्वे लाइन वर जाऊन जीव दे मात्र माझ्याकडे येऊ नकोस कारण तुझा नवरा तुला टाकेली मुलगी माझी नाही म्हणतो म्हणून. माईचा विश्वास बसेना की त्यांची आई असे बोलत आहे. माई म्हणाली आई गं मी येत नाही तुझ्याकडे पण आज मला काहीतरी खायला दे. भूक लागली बग लवकर दे त्याच्या आईनी माईला रात्रीच्या कण्या दिल्या माईनी त्या कण्या आपल्या जवळच्या कापडात घेतल्या त्याचे गट्ठे बांधून माई तिथून निघाल्या तेव्हा त्याच्या पुढे कोणतीच दिशा नव्हती कोणी वाली नव्हता डोळ्यात अश्रू होते. पण पुसणारे कोणाचा नव्हते. आणि त्याच क्षण. माईनी आपल्या चिंधी नावाची चिंधी श्री कृष्णाच्या करंगळीला बांधली आणि त्या चिंधीच्या सिंधु झाल्या.

बस मग माई पुढे पुढे चालत गेल्या रात्रीचा 1 चा टोला घड्याळात पडला आणि त्या वर्धातल्या सरकारी दवाखान्यात पोहचल्या डॉक्टर समोर होते. माईची अवस्था गंभीर होती डोळे पांढरे झाले होते. माईच्या अंगात बाळअंत रोग शिरला होता. माईच्या डोळ्यातून पाणी वाहत होते. डॉक्टरांनी फक्त नाव विचारले ~~सौभा~~ माईनी नाव सांगितल सौभाग्यवती सिंधू श्रीहरी सपकाळ ~~व~~ डॉक्टरांनी माईची अवस्था बघून त्यांना लवकर पलंग दिला / भरती करून घेतल.

दोन घडीचा डाव त्याला
जीवन ऐसे नाव

त्यांचा डाव पूर्ण उधळला होता सर्व काही संपून गेल शिल्लक फक्त आईने दिलेली शिदोरी होती आणि तोंड धुवून शिदोरी खायला बसल्या पण उचललेल्या घासाचा लांब तार होत होता. पण भुकेच्या सपाट्यात तारासहीत तो घास घातला आणि एका नर्सने तो घास पाडला आणि ती शिदोरी कच-यात टाकली आणि म्हणाली शिळ नासक खाता आणि आमच्या वर ठणाठणा करीत दवाखान्यात येतात. तेंव्हा माई ~~म्हणाल्या~~ म्हणाल्या ताई खूप दिवसांनी अन्न खायला मिळाल होत पण नाही खाऊ दिल मला. नर्स ~~ब~~ बाहेर गेली आणि सोडघार पाळ्या भेंडीची भाजी आणली आणि माईला म्हणाली हे खा पोटभर आणि माई पोटभर जेवल्या आणि मऊमऊ ~~ब~~ गाधीवर झोपल्या त्यांना सुखाची झोप लागली 16 दिवस त्या दवाखान्यात होत्या.

VEDHA
Page No. :
Date : / /



परत वनवासाचा दिवस निघाला दवाखान्यातले कपडे परत दिले फाडके नेसले आणि माई तिथून निघाल्या आणि पुन्हा भ्रमंती सुरु झाली आणि त्या दिवशी सोमवार होता बाया देवाला हळद कुंकू वाहत होत्या. पण माईला मंदिरात जायची भिती वाटली बाया त्यांना हकलावून देतील. माई मंदिरासमोर झाडाखाली एक कपडा टाकून त्यात मूलीला झोपवल आणि डोळे मिटून गाणे गाऊ लागल्या.

त्यागीले का राम प्रभूनं
लक्ष्मणा मजला असा मी
काय गुन्हा केला

गाणे पूर्ण झाले माईनी डोळे उघडले त्याच्या समोर त्यांच्या मूलीच्या अंगार दहा पाच पैशाची बरीच नाणी पडली होती. तीला त्याची तमा नव्हती माईनी ती नाणी गोळा केली आणि मोजली जीवनातली पहिली भीक अडीच रुपये मिळाली होती. असे माई म्हणाल्या. त्या न मागता. माईना वाटल आत्ता काहीतरी घेऊन खावं. हॉटेल भरपूर होती पण तेथे जायची हिम्मत नव्हती. आणि संस्कृती आडवी येत होती. त्या हॉटेल मधी न जाता एक बाई फुटाने विकत होती. माई त्या बाईजवळ जाऊन म्हणाल्या. बाई मला फुटाने द्या पैसे आहेत माझ्याजवळ. ती बाई माईकडे असे बगत होती जसे हारवलेल सापडले. आणि ती बाई. माईला रिक्षात बसली आपल्या घराकडे एका गरीब वस्तीत नेले. माई रिक्षाच्या रुपाने पूढे जात होत्या.

एकदाचा तो रिक्षा गरीब वस्तीत येऊन
थांबला. आणि त्या म्हातारीने माईला घरात
नेलं आणि रिक्षाला जायला सांगितलं.
आणि झोपडीचे दार बंद झालं. आणि माईची
गति थांबली. बाहेर पाऊस चालू होता
विजांचा आवाज कडाकडा होत होता. आणि
माई राहिलेल्या घरात अंधार होता. आणि
म्हातारी जवळ बसून काहीतरी बडबडत होती.
माईला काही कळत नव्हतं. म्हातारी हात हातवा
विचारत होती. तू तुझी सुटका कशी केलीस
तुला त्यांनी बांधून टाकलं होते तिरडीवर तुझे
हात पाय ~~क~~ त्याने बांधलं होते तुझ्या
बाळाला तुझा पोटावर झोपलं होते. आणि
तू कधी कोठून आली. आणि तुझ्या अंगावर
नवं पातळ होतं. सत्ते. ते काय केलस
जाऊदे मी तुला नवं देते. घाबरू नको
पण सत्ते आता घराबाहेर जाऊ नको बाई
तुला ते लोक परत नेतील मी बाहेर
गेली तर तू बाहेर जाऊ नको. दे तुझी
बाई इकडे तिला तेल लावते. बाहेर पाऊस
चालू होता. म्हातारीला सत्ती भेटली होती
आणि माईला आईला भेटली होती. माईला
नंतर समजलं की म्हातारीला एकच मुलगी
होती ~~त्या~~ तीने त्या मुलीला खूप लाडाने सांभ
ळलं होते. तिचे नाव सरस्वती आणि म्हातारी
तिला सती म्हणत. मुलीचं लग्न केलं.
घरजावाई केलं. मुलीला एक मुलगी झाली.
एकदिवस म्हातारी कामावरून घरी आली तिला
आवाज दिला पण सती दार उघडत नव्हते

Page No. :
Date : / /

12

त्या दोघी चिरनिद्रेत होती सतीला मुलगी होईन पंधरा दिवस झाले होते. सती आणि तिची मुलगी विषारी द्रव पिऊन मेली होती, आणी घरातले सामान घेऊन जावाई फरार होता. म्हातारीची सती तिला सोडून गेले या विचाराने ते पागल झाली. मुलीच प्रेत उचलू देत नव्हती म्हणून शेजाऱ्यांनी तिला घरात बंद केले आणि म्हातारीची सती निघून गेली परत कधीच न येण्या करता म्हातारी पूर्ण वेडी नव्हती पण अर्धवट वेडी होती. ती शुद्धीत असली तर बंगल्यावर जाऊन धुनी भांडी करायची कधी फुटाने विकायची कधी डोकं फिरले की फुटाने फेकुन दयायची आणि सते सते करत फिरायची जणू तिला माहित होते सती परतनार म्हणून आणि असच फुटाने विकताना माई समोर आल्या होत्या. सती आणि माई सारख्या दिसत असतील कदाचित म्हणून म्हातारीला माईना घरी नेण्याची घाई झाली होती. म्हातारी बंगल्यावर कामाला जाताना घराला कुलीप घालून जायची कारण सती पुन्हा हारवेल म्हणून ही माईची आई माईला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपत होती. तर कधी कधी रात्र रात्र हसायची तर कधी सती म्हणून अंगावरून हात फिरवायची माईला त्या. तीला सांगावे वाटायचे कि मी त्यांची सती नाही सिंधु आहे. पण असे विचार मनात आले कि माईला भिती वाटायची, माई म्हातारीजवळ सात महिने होत्या.

VEDHA
Page No. :
Date : / /

पण इथेही नशीबाने पाठ सोडली नव्हती दुर्दैव घाव कधी घालावा याची वाट बघत होते. आणी तो भयानक दिवस उगवला. म्हातारीला एकच अॅट्याक आला दोन रक्ताच्या उलट्या झाल्या आणी ही माऊली देवा घरी गेली.

झाडाला धडकुन गेली ममतेह
ची पिसाट माता
मी पंख जमविले तेव्हा
तिने देह ठेवीला होता

परत समोर अंधार झाला होता माई ची ही आई माईला सोडून तिच्या खऱ्या सतीला भेटव्या गेली होती. माईला त्या म्हातारीच्या घरातून बाहेर काढण्यात आले. आणी भाड्याचे घर त्या मालकाने ताब्यात घेतल तिचे दुसरे नातेवाईक येऊन काही किडूक मिडूक शोधु लागले. पण म्हातारीचे नातेवाईक माईला त्व तीच्या जवळ जाऊ देत नव्हते. अखेरचे डोळे भरून माईनी म्हातारीस बघीतले आणी तिथून निघाल्या माई पुन्हा उघड्यावर पडल्या होत्या. परत वनवासी झाल्या.

तकदीर की कम नसीबी
थी वहॅ!
मरकर भी नहीं निकली ॥
लेहत खोदी लोगोने तो
पत्थर की जमी निकली ॥

VEDHA
Page No. :
Date : / /

माई चालत चालत रेल्वे स्टेशनवर आल्या. परभणी- नांदेड - मनमाड रेल्वे स्टेशनवर माई भिक्षा मागू लागल्या मुलीला समोर झोपवून माई गाणं गाऊ लागल्या

हा दिनेची किव येऊ द्या काई
भिक्षा वाडा माई
दो दिवसाचे सर्व घेऊनी बाळ
मी फिरले रानो माळ
दो दिवसाचा शिळा वाळला तुकडा
चालेल आम्हाला वाडा !

ग. ला. ठोकळ.

माई ~~भिक्षा~~ दिवसभर भिक्षा मागत आणि रात्री स्टेशनवर आ जायच्या एक म्हतार स्टेशनवर रडत होत. माई त्याला खाऊ पिऊ घातल्या त्यानच्या जवळ जमा झालेली भिक्षा माई गरीबात अनाथ मुलांमध्ये लोकांमध्ये वाटून खात असत.
माई गाणे म्हटले की त्यांना खायला भेटायचं माईनी भिकाऱ्यांना खायला दिल भिकाऱ्यांनी माईना सैरक्षण दिले. भिकाऱ्यानमधली मानवता माईला दिसली भिकारी रात्री झोपता. माईना मधी झोपवायचे हे आणि ते आवती भोवती झोपायचे. ते झोपले की माईला भिती वाटायची मग माई स्मशानात जायच्या कारण भुताच्या भितीने स्मशानात कोणीच येत नाही. खूप रात्री माई स्मशानात घालवल्या पण एका रात्री माई चालत होता तेव्हा माईना दिसले की एका गरीबाची प्रेत यात्रा.

जात आहे. माई त्या प्रेत यात्रेच्या
मागे मागे जात होत्या तेव्हा प्रेताला
विसावा दिला ओळजळभर पीठ आणि सव्वा
रुपाया माई मागे जाता जाता थांबल्या
घाबरल्या विचार केल्या कि लोक काय
म्हणतील ही बाई कोण आमच्या मागे
का येत आहे जादू टोणा करणारी
म्हणतील म्हणून माई तिथेच लांब उभ्या
राहिल्या झाडाच्या आडोशाला बसल्या
प्रेत यात्रा विसावली तिथील लोक गेले.
~~माईची~~ माईना सुरेश भटट यांची कविता
आठवते त्या म्हणतात.

इतकेच माझ जाताना सरनावरती
कळले होते.
मरणाने केली सुटका जगण्याने
छळले होते.
मी एकटाच त्या रात्री आशेने तेवत
होतो. मी विझलो तेव्हा सारे
आकाश उजळले होते.

प्रेत जळत होते माई त्या प्रेताच्या जवळ
गेल्या रात्र सामसूम झाली. माई स्मशानात
जाता जाता ते ओंजळभर पीठ माई
नी घेतल आणि फुटलेल्या मडक्याचे
तुकडे घेतले एका तुकड्यात पाणी होते.
त्या मडक्याच्या तुकड्यात पाणी घातल पीठ
घातल एक छोटीसी भाकरी केली.
आणि जळणारे प्रेताच्या निखाऱ्यावर ती
भाकरी भाजली आणि तिथेच बसून खाली.
माई स्मशानात जोरजोरात रडत होत्या. कारण

VEDHA
Page No. :
Date : / /



गाव शेजारीच होत गावातील माणसे येतील आणि विचारतील काय झालं.
का रडत आहेस माईचं रडणं ऐकुण लोक बाहेर आलं दार उघडलं आणि एकमेकाला सूचना दिल्या कि दारे पक्की बंद करा लेकरांना झाकुन द्या आज रात्री कोणी बाहेर पडू नका कारण स्मशानात आज भूत रडत आहे. त्यांनी बोललेलं माईंना ऐकायला जात होतं. दार जशी उघडली तशी ती परत बंद झाली माईजवळ कोणी आलं नाही आणि त्या दिवशी माईनी स्मशान सोडलं.

माई म्हणतात फुलांच्या पायगड्या वरून चालताना काटे बोचले तर सहन करायला शिका.

वाटेवर काटे पाय अनवाणी
परी काळजात माझ्या
जनाईची गाणी
वाटेवर काटे पाय अनवाणी
पायाखाली वाळवंट पायाखाली भेगा
परी काळजात माझ्या
वाहे चंद्रभागा
वाटेवर काटे पाय अनवाणी
परी काळजात माझ्या जनाईची गाणी.

माई काम शोधत चिखलदऱ्यात पोहचल्या. तिथे रस्ताबांधणीला सुरुवात झाली होती. स्थानिक आदिवासी आणि मध्य प्रदेशातील मजूर तिथे काम करत होते.
एक कंत्राटदाराने माईना कामावर ठेवण्यास नकार दिला. सकाळ संध्याकाळ कुटकी (भात) डाळ आणि आठवड्यातून एकदा ताक या बोलीवर माईनी तिथल्या मजुरांची मुलं सांभाळण्यास सुरुवात केली.
चिखलदऱ्याचं काम संपल्यावर हे मजूर पुण्याला आले. आई माई त्यांच्याबरोबर निघाल्या.

एकदा असेच माई पुण्यात कामासाठी फिरत असतांना त्यांना एक मुलगा रडत बसलेला दिसला. आपलं नाव त्यांनी 'दिपक गायकवाड' एवढंच त्या मुलाला सांगता येत होतं. आसपासच्या लोकांनाही काहीच माहिती नव्हती. त्या मुलाला घेऊन माई पोलिस स्टेशनात गेल्या तर पोलीसांनी माईनां हाकलून लावलं. माईनी आठवडा भर पोलिस स्टेशनबाहेर बसून काढला पण पोलीसांनी तक्रारही नोंदवून घेतली नाही. माईनीच मग त्या मुलाचा सांभाळ करायचं ठरवलं. पुढे महिनाभरात अशीच 2-2-3 मुलं त्यांना रस्तावर भीक मागताना भेटली आणि माईनी त्यांनाही आपल्या पदराखाली घेतलं. निराश्रितांचं जगणं किती भयंकर असतं ते त्यांनी अनुभवलं होतं. ते या मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून हे त्यांची इच्छा होती.

या मुलांमुळं आपल्याही जगण्याला काही अर्थ मिळेल, असं त्यांना वाटलं. पण या मुलांचा सांभाळ करायला पैसे काढून आणायचा? स्वतःचेच पोट तिथे भरलं जात नव्हतं आणि आता जोडीला ५ मुलं होती. आणि त्या मुलांनी भूक मागणं माईंना मंजूर नव्हतं.

त्यावेळी भारत- रशिया मैत्री करारावर पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात सह्या होणार होत्या. ऐतिहासिक करारासाठी मोठा समारंभ योजला होता. कडेकोट बंदोबस्त होता. माईच्या लक्षात आलं की आपण व्यासपीठावर जाऊन दोन शब्द जर बोलू शकलो तर इथे जमलेल्या हजारो प्रेक्षकांच्या मनांत आपण जागा करू शकू आणि मग आपल्या संकटातून मार्ग निघू शकेल. त्यांनी हळूच सभागृहात प्रवेश केला. झाडूवाली असेल म्हणून त्यांच्याकडे कोणीचं लक्ष दिले नाही. व्यासपीठावर एक काश्मिरी माणूस आपल्या व्यथा सांगत होता. तो भाषण संपवून खाली उतरताच माईंनी थेट व्यासपीठावरच उडी घेतली. दुसरा वक्ता अजून उठायचा होता. त्याआधी माईंनी सरळ माईक धरला आणि भाषण सुरू केलं त्यांचा खणखणीत आवाज आणि कविता ऐकून सगळं स्तब्ध झालं. टाळ्यांचा कडकडाट झाला, आणि माईंना जे हवं होतं ते मिळाल. आता त्यांना मदत नक्कीच मिळणार होती.

कार्यक्रम संपला आणि श्री. सुनील दत्त समोर आले. त्यांनी माईशी हस्तांदोलन केलं. माई थक्क झाल्या. सर्वजण माईचं कौतुक करत होते, पण त्यांचं तिकडे लक्ष्य नव्हतं, त्यांना भूक लागली होती. शेवटी त्यांनी हळूच विचारलं, खाना है क्या? कार्यक्रमानंतर आमंत्रितांसाठी बडा खाना मांडलेलाच होता. माई गेल्या आणि त्यांनी पूर्ण ताट भरून अन्न घेतलं तिथेच जमिनीवर बसून जेवू लागल्या. एवढं ताटभर अन्न त्यांनी आयुष्यात पहिलांदाच पाहिलं होतं.

त्या जेवत असतानाच दगडूशेठ हलवाई मंदिर समितीचे तात्यासाहेब गोडसे तिथे आले. आणि त्यांची विचारपूस केली. त्यात तात्यासाहेबांनी माईच्या मुलीला, ममताला सांभाळण्याची तयारी दाखवली, आणि ममताला पुण्याच्या सेवासदनमध्ये दाखली झाली. त्याच कार्यक्रमात आकाशवाणीचे यशवंत खरातही होते. माईचा खडा आवाज त्यांनी ऐकला होताच. त्यांनी माईना आकाशवाणीवर कार्यक्रम करायला माईना आमंत्रण दिलं. त्या मुलांना बरोबर घेऊन माई मुंबईला निघाल्या. पण स्वतः च्या मुलीला माईनी दुस-यांना सांभाळायला का दिलं?

20

माई सांगतात, " रस्त्यावर बेवारस सोडलेली मुलं माझ्याकडे सांभाळायला होती. मी जे काही सोसलं होतं त्यानंतर माझा हा मार्ग मी निश्चित केला होता.
माझ्या मुलीला मी त्यांच्यासोबत सहज सांभाळू शकले असते. पण एखाद्या दिवशी मुलांना उपाशी राहण्याची वेळ आली असती तर? मी काय केलं असतं?
त्या मुलांना मी सांभाळणार होते, ती मुलं तशीच पाणी पिऊन झोपली असती. पण माझी मुलगी त्यांच्याबरोबर असती तर माझी माया जागृत झाली असती. तिला मी अंधारात नेऊन गुपचुप दोन घास खाऊ घातले ~~असते~~. नसते का?
मला अन्याय करायचा नव्हता म्हणूनच मी मुलीला दगडूशेठ गणपतीच्या पायाशी घातले आणि पुढे निघाले. माझ्यातली आई चुकली असती तर मग माझ्याच्याने इतर मुलांचा सांभाळ झाला नसता.
आकाशवाणीवर गाऊन माईंनी 350 रु महिना मिळू लागले. दूरदर्शनवरही त्यांच्या गाण्याचे 2 कार्यक्रम झाले. आणि जमा झालेले पैसे घेऊन माई चिखलदऱ्याला परतल्या. एक झोपडी बांधून त्यांनी आपला आश्रम थाटला. हळूहळू मुलांची संख्या वाढू लागली. रस्त्यावर सापडलेली, कचऱ्यात फेकलेली अनाथ झालेली मुलं माईंनी आपली मानून चिखलदऱ्याला आणली.
त्याचवेळी महाराष्ट्र - मध्य प्रदेशाच्या

सीमेवरील मेळघाट जंगलात व्याघ्र प्रकल्पासाठी ~~स्थान~~ स्थाननिश्चिती होत होती. या प्रकल्पात जंगलातील 84 गावांतील आदिवासी निर्वासित होणार होते, आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडे कोणतीही योजना नव्हती.
माईनी आदिवासींची बाजू शासनासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. कोणीच लक्ष्य देत नाही हे पाहून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयावर 2-3 मोर्चेही नेले. तेव्हाचे वनमंत्री छेदीलाल गुप्ता यांच्या कानावर हा प्रकार गेला आणि त्यांनी आदिवासींचे पुनर्वसन झाल्याशिवाय व्याघ्र प्रकल्प सुरु होणार नाही, असं आश्वासन माईना दिलं.
अजून एक लढाई माई जिंकल्या, पण अशा अनेक लढाया त्यांना रोजच लढाव्या लागत होत्या.

चिखलदऱ्याचा परिसर ख्रिश्चन मिशनऱ्यांनी व्यापला आहे. माईचं अनाथालय त्यांना त्या परिसरात नको होतं. त्यांनी माईवर अनेकदा दबाव आणला. 'तुझी मुलं आम्हाला दे, आम्ही तुला पैसे देतो', म्हणून अनेकदा त्यांच्याकडून निरोप आला.

मेळघाटच्या जंगलात मजा करायला येणाऱ्या राजकारण्यांसाठी बंगल्यावर मुली धाडण्यास दडपण आणलं गेलं. मात्र ही मुलं हिसकावून घेण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा माई अक्षरशः यवतमाळून उठल्या. अमरावतीपासून ते थेट दिल्लीपर्यंत माईनी तक्रारी केल्या, पण उपयोग शून्य झाला. पण बेघर होऊनही माई चिखलदऱ्यातून पळ काढत नाही, हे पाहून

मिशनऱ्यांच्या गुंडांनी माईवर हल्ला केला एका महिन्यातच माईवर दोन हल्ले झाले. माई तरीही बधल्या नाहीत. मुंबईला निघाल्या असता त्यांच्यावर तिसरा हल्ला झाला, आणि त्यात त्या जबर जखमी झाल्या. त्यानंतर मात्र माईनी त्या परिसरातु बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

माईचा पहिला मुलगा दिपक त्यांना पुण्याला सापडला होता. माईच्या एका मुलाखतीत दिपकचा उल्लेख वाचून सासवडहुन कोणी त्याचे नातेवाईक त्याचा शोध घेत चिखलदऱ्यास आले. दिपकच्या आजोबांनी त्यांच्या ~~शोध घेत~~ मृत्यूपूर्वी थोडी जमीन आपल्या बेपत्ता, अनाथ नातवासाठी ठेवली होती. दिपकने आता आपल्या गावी परत जावं अशी त्या नातेवाईकांची आणि माईची इच्छा होती. पण दिपकने नकार दिला. माईनीच त्याला वाढवलं होतं, आता त्यांना सोडून कुठेही जाण्याची त्याची तयारी नव्हती. मात्र मिशनऱ्यांनी केलेल्या हल्ल्यानंतर दिपक माई आणि अनाथाश्रमाती मुलांसकट चिखलदऱ्यातून बाहेर पडला. आणि कुंभारवळण या सासवडजवळ असलेल गावात आजोबांनी नावे करुन दिलेल्या जमिनीवर 'ममता बाल सदन' उभं राहिले

★ ममता बाल सदन ★

अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी सिंधूताई यांनी ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली.

VEDHA
Page No. :
Date : / /

1994 साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावातही संस्था सुरु झाली. आपली कन्या ममता हिला दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन येथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला. येथे लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाते. त्यांच्या भोजन, कपडे अन्य सुविधा यांची उपलब्धता संस्थेकडून केली जाते. शिक्षण पूर्ण झाल्यावर येथील मुले आर्थिक-दृष्टया स्वावलंबी होतील यासाठीही त्यांना मार्गदर्शन दिले जाते. आर्थिक~~दृष्ट्या~~ दृष्टया स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून देणे आणि त्यांच्या विवाहाचे आयोजन करणे हे कार्यही संस्थेकडूनच केले जाते. अशी सुमारे 1050 मुले या संस्थेत राहिलेली आहेत.

आज महाराष्ट्रात माईंची चार अनाथाश्रम आहेत. ~~व~~ 1042 मुलं तिथे राहतात. काही वर्षांपूर्वी माई चिखलदऱ्यास परतल्या आणि तिथं त्यांनी मुलींचं वसतीगृह सुरु केलं. आज 100 मुली तिथे राहून शिक्षण घेतात. माईंना आज सुमारे 1500 मुलं आहेत. दोन दिवसाच्या मुलापासून ते 72 वर्षाच्या वृद्धांपर्यंत सगळीच त्यांची मुलं, विधवा परित्यक्ता, मनोरुग्ण या त्यांच्या लेकी. माईंनच्या मुलींनच आडनाव साठे तर मुलांचं सपकाळ असतं 400 सुना आणि 200 जावाई माईंना आहेत.

बरीचशी मुलं शिकून स्वतःच्या पायावर उभी आहेत. त्यांची मुलं डॉक्टर वकील शिक्षक आहेत. हे सांगताना त्यांचा चेहरा फुलून येतो. माईच्या मुलांची नातवंडांची लग्नं बारशी तर नेहमीच असतात शिकून नोकरीला लागून मुलं दूर गेली, तरी माईच्या ओढीनं ती परत येतात. माईशिवाय आयुष्य जगणं त्यांच्यासाठी संभवत नाही याशिवाय वर्धा जिल्हात एक वृद्धाश्रम, गोरक्षण केंद्र आणि परित्यक्तांसाठी चिखलदऱ्याला वसतिगृह माईनी सुरु केलं आहे त्या सांगतात.

"सर्वांनी, जन्मदात्या आईनंही पाठ फिरवली तेव्हा गोठ्यातल्या गाईनं मला संरक्षण दिलं, म्हणून मी गाईलाच माझी माय मानलं. तुझ्या ऋणातून उतराई होईन, असं मी तिला वचन दिलंय" वर्ध्याच्या गोरक्षण केंद्राच्या रुपानं माईनी आपलं वचन पाळलं आज रस्तावर सोडलेल्या भाकड गायींचा कावळ्यांनी डोळे फोडून जखमी केलेल्या गायींचा सांभाळ या केंद्रात केला जातो. ३० वर्षे राज्यभर हिंडून, भीक मागून भाषणं करून, कविता म्हणून माईनी त्यांचा हा संसार उभा केला आहे.

गाण्यानं, कवितेनं माईना जगवलं, आणि आजही कविताच त्यांचा आधार आहे. बहिणाबाई, सुरेश भटांच्या कवितांचं ऋण त्या मान्य करतात.

VEDHA
Page No. :
Date : / /

या साहित्यिकांनी मला दुःखातून बाहेर काढलं आणि सांगितलं. व्रण जपत रहा, गात रहा, पुढे जात रहा.
साहित्य माणसाच्या पायात बळ देतं, जखमा पुसतं, बेभान करतं, उन्मत्त करतं.
कवितांमुळेच माझ्या वेदना मी विसरू शकले' असं माई नेहमी सांगतात. त्या स्वतः उत्तम कवयित्री आहेत. त्यांच्या कवितेतही ही वेदना असते.
" वेदनेशिवाय कविता निर्माण होत नसते. वेदनेतून निर्माण झालेली कविता काळजाशी नातं जोडते." माई सांगतात.

दिपक आणि ममता ही त्यांची मुलं त्यांचं बरचसं काम आता सांभाळतात ममताने MSW केलं आहे. ( सख्खी आई जिवंत असताना अनाथश्रमात नेऊन टाकलं, आणि इतरांच्या मुलांना सांभाळलं, म्हणून आपली मुलगी आपल्याला बोल लावेल याची माईना सतत भीती वाटत असे, पण ममताला आपल्या ~~आने~~ आईने केलेल्या त्यागाचं मोल ठाऊक आहे. माईनी उभ्या केलेल्या पसाऱ्याचा तिला प्रचंड अभिमान आहे

ममताप्रमाणेच आपल्या इतर मुलींनी शिकावं म्हणून माई झटत असतात.
( स्त्री कधीही हरणार नाही. कारण तिला वेदना म्हणजे काय ते ठाऊक असतं.
विदर्भात इतक्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या पण, एकातरी शेतकऱ्याच्या बायकोनं आत्महत्या केल्याचं कधी ऐकलं नाही. ती कधीही या जगातून पळ काढणार नाही.

कारण स्त्रीची वेदना तिला जगायला शिकवते. स्त्रीचं आयुष्य कसं? मंदिरात ठेवाल तर नंदादिप मुठीत धराल तर आग, पण. तरीही स्त्रीच कायम वेठीस धरली जाते. रमाबाई, पुतळाबाई पासून ते रूपकंवरपर्यंत असंख्य स्त्रिया सती गेल्या. समाजात आजवर एक तरी 'सत्या झाला आहे का? विलक्षण नाट्यमय आयुष्य जगलेल्या माई वेदनांची कीव करून त्यांचा पराजय कसा करायचा' हे असं सहजपणे सांगून जातात. "चिखल आणि पाण्याचं जे नातं ते दुःखाचं माझ्याशी आहे. असे माई म्हणतात या चिखलातच, म्हणजे ओल्या मातीतच बीज अंकुरतं, पण असा ओलावा माईला कधीच मिळाला नाही माई खडकावरच रूजल्या पण माझी मुळं पक्की, चिवट आहेत ती कधीही मोडून पडणार नाही, असे त्या म्हणतात.

माईनी केलेल्या संघर्षाची पावती म्हणून त्यांना आजवर 172 पुरस्कार मिळाले आहेत. पण ज्यांच्यामुळे आणि ज्यांच्यासाठी ~~पुरस्कार मिळाले~~ बेघर व्हावं लागलं, त्या पिंपरीमधीच्या गावकऱ्यानी माइचं कौतुक केलं आणि त्यांना आश्चर्यच वाटलं. माईने छेडलेल्या आंदोलनामुळेच आज गावकऱ्यांना शेणासाठी महिना हजार रूपयं तरी मिळतात. आपल्या गावातील एक स्त्रीने देशात नाव काढलंय, याचा त्या गावकऱ्यांना अभिमान आहे. जो गाव माईवर थुंकला तोच गाव ~~ब~~ त्यांनच्या नावाने आज

जयजयकार करतो. त्यांनचं नाव झाल्याव त्यांचे पतीही त्यांच्याकडे आले. त्यांन सांभाळणार कोणीच नव्हतं. माईंनी त्यांना सांगितलं की मी तुमची आई होऊ शकेन पत्नी मात्र कधीही नाही. पटत असेल तर रहा.

'हे निखारे मी स्वतःहून पदरात बांधून घेतले आहेत. जिवंत असेपर्यंत मी त्यांची राख होऊ देणार नाही,' असे म्हणत न थकता माई काम करत होत्या.

माई म्हणतात 'मला 172 पुरस्कार मिळाले. पण ते पुरस्कार खाऊन पोट भरत नाही. म्हणून माई आजही लोकांसमोर पदर पसरतात. चारपैकी एकाच अनाथाश्रमाला सरकारी अनुदान मिळतं

सात-आठशे मुलांच्या खर्चाची तजवीज करताना माईची दमछाक होते. 'गाना नही तो खाना नही, भाषण नही तो राशन नहीं.' असं म्हणत आपल्या मुलांना दोन वेळ जेवायला मिळावं म्हणून त्या महाराष्ट्र भर हिंडत असतात.

माईंनी अनाथ मुलं वाढवली, त्यांच्या अनाथपणाची जाणीव न होऊ देता त्यांना वाढवलं, मोठं केलं, शिक्षण दिलं जगण्याची प्रेरणा दिली. पण सगळ्यांत महत्वाचं म्हणजे माईंनी त्या मुलांना या समाजात मानाचं स्थान मिळवून दिलं. 'निराश्रित, बेवारस' असा शिक्का त्यांच्यावर बसू दिला नाही. या मुलांनाही त्याची जाण आहे. आपल्याला जे प्रेम मिळालं तेच इतरांनाही मिळावं

म्हणून त्यांची धडपड सुरु असे. देवा आम्हाला हसायला शिकवलं, परंतु आम्ही कधी रडलो होतो. याचा विसर पडू देऊ नकोस, हे माईनी त्यांना शिकवलं आहे.

माईनची एक कविता.

उतरलं नव्हतं अजून
पाठीवरील शिक्षणाचं ओझं
लहानपणीच संसारात सांगा
मन कसे रमलं हिचं?
हसण्या - खेळण्याच्या दिवसात
असं मातृत्व हे आलं:
सासरी नांदताना मात्र
बालपण कधीच हरवलं
सुखी संसाराचं स्वप्न पाहिलं
मग मेघ काळे का दाटले?
तुकड्या - तुकड्याने काळीज फाटलं
जेव्हा पतीनेही झिडकारलं
इवलासा जीव कुशीत घेऊन
भिक मागीतली घरदार असून
मरण हि येईना - - थांबं पुन्यात
येऊन ~~ति~~ पोटच्या गोळ्याची करुन हाक
ऐकुण नियतेनीही बघा हिला कशी फिरवत
मातेनेही बघा हिला कशी दूर लोटली?
घरदार, धनी असून देखील
पोरीला या अनाथ केली - - -
पोरकं झालेल्या लेकरांची
आस हिला लागली
कोठं होती? कोठं गेली?
अनाथांची हि माई" बनली, - - -

VEDHA
Page No. :
Date : / /

★ सिंधुताई यांनी अन्य समकक्ष संस्थाही स्थापन केलेल्या आहेत.

- बाल निकेतन हडपसर, पुणे
- सावित्रीबाई फुले मुलींचे वसतिगृह, चिखलदरा
- अभिमान बाल भवन वर्धा
- गोपिका गाईरक्षण केंद्र, वर्धा (गोपालन)
- ममता बाल सदन, सासवड
- सप्त सिंधू महिला आधार बालसंगोपन व शिक्षणसंस्था पुणे

★ सिंधुताईंना सुमारे 750 राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.
त्यातले काही पुरस्कार:-

- पद्मश्री पुरस्कार :- [2021]
- महाराष्ट्र शासनाचा :- डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार [2012]
- पुण्याच्या अभियांत्रिकी कॉलेजचा 'कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुरस्कार [2012]
- महाराष्ट्र शासनाचा = अहिल्याबाई होळकर पुरस्क [2010]

30

VEDHA
Page No. :
Date : / /

- मूर्तिमंत आईसाठीचा राष्ट्रीय पुरस्कार [2013]
- आयटी प्रॉफिट ऑर्गनायझेशनचा दत्तक माता पुरस्कार [1996]
- सोलापूरचा डॉ. निर्मलकुमार फडकुले स्मृती पुरस्कार
- राजाई पुरस्कार
- शिवलीला महिला गौरव पुरस्कार
- श्री रामपूर - अहमदनगर जिल्हा येथील सुनीता कलानिकेतन न्यासातर्फे कै. सुनीता त्र्यंबक कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिला जाणारा सामाजिक सहयोगी पुरस्कार [1992]
- सीएनएन - आयबीएन आणि रिलायन्स फाउंडेशनने दिलेला रिअल हीरो पुरस्कार [2012]
- 2008 - दैनिक लोकसत्ताचा 'सह्याद्रीची हिरकणी पुरस्कार
- प्राचार्य शिवाजीराव भोसले स्मृती पुरस्कार [2015]
- डॉ राम मनोहर त्रिपाठी पुरस्कार [2017]
- पुणे विद्यापीठाचा जीवन गौरव पुरस्कार
- पद्मश्री पुरस्कार [2021]

माई म्हणतात शिकलेलं लिहू शकतात
जास्त शिकलेले लिहू शकतात मग अडाणी
का नाही लिहू शकत? जमल का?
मग माई लिहायला लागला दिपकने माईला
चहा पाजायचा आणि माईनी लिहायच.
माई म्हणाल्या जर मी लिहता लिहता
सोडल तर मी परत लिहणार नाही
माई म्हणतात मला जगताना त्रास नाही
झाला पण पुस्तक लिहताना झाला.
कारण पुस्तक लिहत असताना माई दोन
महिने आजारी पडल्या होत्या माई जेव्हा
पुस्तक लिहत होत्या तेव्हा त्या दुःखमय
झाल्या होत्या शब्दबध्द होत होत्या
माईनी ते पुस्तक सोळा दिवसात लिहलं
होतं. आणि ते पुस्तक म्हणजे मी
वनवासी चार आवृत्तीच
रसीक स्टोर, पुणे, वावी भट यांनी पुस्तक
घेतलं नाही. दिनकर गांधन मैन प्रकाश
यांनी माईच पुस्तक छापनास मनाई केली.
माईच पुस्तक छापल ते ~~कोल्पा~~ कोल्हापूर
जिल्हात जयसिंगपूर ला छोट्याश्या गावामध्ये
आणि माईनी ते पुस्तक स्वतः विकल
आत्ता तेच माईचे पुस्तक मी वनवासी हे
10 वी च्या अभ्यासक्रमाला कर्नाटकला
माई म्हणतात माझं पुस्तक 10 वीच्या
अभ्यासक्रमाला कर्नाटकात आहे, पण महाराष्ट्रा
नाही याच कारण ह्या महाराष्ट्रात
मोठ व्हायच असलं तर मराव लागतं बाबा
महाराष्ट्र मोठे व्हायचं असल तर मराव लागत
मेल्या नंतर जिथं माणस मोठी होतात त्याच
नाव महाराष्ट्र असे माई म्हणतात.

32

## ★ प्रसारमाध्यमांतील चित्रण ★

संपूर्ण जगभरात सिंधूताईच्या कामाची दखल घेण्यात आली. असून अनेक मुलाखतींमधून त्यांचा जीवनप्रवास आणि त्यांचं काम याचा आढावा घेण्यात आला आहे. त्याच्यावर आधारित एक मराठी सिनेमाही प्रकाशित झाला आहे. तो चित्रपट म्हणजे मी सिंधुताई सपकाळ हा या चित्रपटात सिंधूताइची भूमिका तेजास्विनी पंडित या अभिनेत्री ने साकारली आहे.

सिंधूताई सपकाळ यांच्या जीवनावर भार्गव फिल्म्स ॲन्ड प्रॉडक्शनचा 'अनाथांची यशोदा' या नावाचा अनुबोधपट 16-2-2014 रोजी निघाला.

VEDHA
Page No. :
Date : / /

सिंधूताई सपकाळ हे नाव आज प्रत्येक मराठी मनावर रुंजी घालणारे आहे. समाजसेवेचे व्रत घेतलेल्या सिंधूताई सपकाळ आज हजारो अनाथ मुलांची आई म्हणून आपल्याला दिसतात. त्यांच्याबद्दल प्रत्येक मराठी माणसाला आदर आहे आणि तो आदर त्यांच्याभोवती कायमच सकारात्मक वलय निर्माण करणारा आहे. सर्वसामान्य गृहिणी, पुढे अनाथांची माई आता पद्मश्री या नव्या बिरुदावलीने त्या ओळखल्या जातील पण त्यांचा प्रवासहि शून्यातून विश्वनिर्मितीचा आहे.

मानवतेची केवळ भाषा न करता ती कृतीतून साकारणाऱ्या सिंधूताई 'अनाथांच्या माई आहेत प्रतिकूल परिस्थितीशी दोन हात करीत आयुष्याला दोष न देता, त्याव मात करीत सिंधुताईनी उभे केलेले काम प्रशंसनीय आणि वंदनीय आहे. त्यांची कहाणी महाराष्ट्राला काही नवीन नाही. खुद्द त्यांच्या भाषणांतून ~~कधी~~ त्यांच्यावरील लेखनांतून आणि चित्रपटातून ते सर्वासमोर आहेच.

★ मृत्यू ★

दिनांक ४ जानेवारी 2022 रोजी पुण्यातील गॅलक्सी हॉस्पिटलमध्ये झटक्याने त्यांचे निधन झाले. मृत्यूच्या एक महिन्यापूर्वी त्यांचे हार्नियाचे ऑपरेशन झाले होते. त्यांना महानुभाव पंथाच्या नियमाप्रमाणे त्यांना भूमिडाग देण्यात आला.